Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2021

## CONSEQUENCES OF BRITISH INVASION OF INDIA : NEED OF REWRITING HISTORY



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor**
**Dr Santosh Bansod,**
Head , Department of History
**Narayanrao Rana Mahavidyalaya Badnera, Dist. Amravati.**

**Editor**
**Dr. Dheeraj Kumar Najan,**
Head , Department of History
**Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalaya, Gadegaon, Telhara Dist. Akola**

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October-2021

ISSUE No- (CCCXX) 320

## CONSEQUENCES OF BRITISH INVASION OF INDIA : NEED OF REWRITING HISTORY



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr Santosh Bansod,
Head , Department of History
Narayanrao Rana Mahavidyalaya
Badnera, Dist. Amravati.

**Editor**
Dr. Dheeraj Kumar Najan,
Head , Department of History
Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalaya,
Gadegaon, Telhara Dist. Akola

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 320 (CCCXX)
ISSN : 2278-9308
October, 2021

## INDEX- 320


| No. | Title of the Paper Name / Authors' | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे आर्थिक जीवनावरील परिणाम<br>प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी | 1 |
| 2 | ब्रिटीशांचे भारतीय अनौद्योगिकीकरण धोरणाचे दुष्परिणाम.<br>प्रा.डॉ.भास्कर शा.वझिरे | 4 |
| 3 | ब्रिटीश राजवटीतील भारताच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा – एक अध्ययन<br>प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे | 7 |
| 4 | ब्रिटीशकालीन भारतातील पहिला दलित क्रिकेटर : बाळू पालवणकर<br>डॉ. लोंढे एच. एम | 12 |
| 5 | भारतातील ब्रिटीश आक्रमणाचे आर्थिक जीवनावरील परिणाम<br>प्रा.सुरेखा रामदास लगड | 16 |
| 6 | ब्रिटिश कालीन भारतातील भू—धारणा पध्दती प्रा.गौतम विक्रम भालेराव | 19 |
| 7 | ब्रिटीश आक्रमण का भारतीय मुस्लिम समुदाय की शिक्षावस्था पर परिणाम के परिप्रेक्ष्य में अलिगढ आंदोलन का महत्व डॉ. सैय्यद मुजाहिद सैय्यद बासित | 24 |
| 8 | ब्रिटिश सत्ता आणि भारतीयांचे आर्थिक शोषण: एक अभ्यास प्रा. डॉ. प्रकाश जंगले | 27 |
| 9 | प्राचीन भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन आणि पुनर्विचार<br>प्रा.गौडदाब लखन अभिमान | 30 |
| 10 | मेमसाहेबांचे कार्ये : इतिहास पुनर्लेखनाची गरज<br>डॉ. सुनिता हनुमंत गित्ते | 33 |
| 11 | ब्रिटीश आक्रमणाचे भारताच्या सर्वांगीण जीवनावर झालेले दुष्परिणाम<br>डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर | 35 |
| 12 | मराठी नियतकालिकांचा उदय आणि विकास डॉ.कल्पना त्र्यं.मेहरे | 38 |
| 13 | ब्रिटिश आक्रमणाचे भारताच्या आर्थिक जीवनावरील परिणाम<br>डॉ. प्रदिप शा. ढोले | 41 |
| 14 | ब्रिटीशांची आर्थिक निती आणि भारतीय उद्योग<br>प्रा. राजेन्द्र एम. देवाळकर | 45 |
| 15 | भारतावरिल ब्रिटीश आक्रमणाचा मेळघाटातील आदिवासी कोरकू जमातीच्या सामाजिक घटकावर झालेला परिणाम . रोशन रामदास भटकर | 48 |
| 16 | भारतातील ब्रिटिश आक्रमणाचे आर्थिक जीवनावरील परिणाम<br>प्रा. डि. बि. भुईभार | 52 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 320 (CCCXX )) | October, 2021

# ब्रिटीश राजवटीतील भारताच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा – एक अध्ययन

प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे
(इतिहास विभाग प्रमुख )
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर जि. बुलढाणा
मो. ९८२२५३०१७१, Email. parmeshwarjunghare07@gmail.com

**प्रस्तावना –**

ब्रिटीश सत्तेचे भारतात आगमन झाले त्यावेळेस भारतातील शिक्षणपद्धती परंपरागत स्वरूपाची होती. साधारणतः मंदिरामधून पाठशाला चालविल्या जात होत्या. गणित, व्याकरण, तर्कशास्त्र, छंद इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जाई, पाठांतरावर जास्त भर होता. शिक्षणाचे माध्यम संस्कृत हे होते. संस्कृत भाषा सामान्य माणसाला समजत नसल्यामुळे तो शिक्षणापासून वंचित होता. मुसलमान समाजाची स्थिती ह्यापेक्षा वेगळी नव्हती मशिदीला लागून असलेल्या मदरशामधून धार्मिक स्वरूपाचे शिक्षण दिले जात होते. ह्या पार्श्वभूमीवर ब्रिटीश सत्तेचे भारतात आगमन झाले. सुरुवातीला इंग्रज राज्यकर्त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदासीन स्वरूपाचा होता. परंतु इ.स.१८१८ मध्ये संपूर्ण भारतावर ब्रिटीश सार्वभौमत्व प्रस्थापित झाल्यानंतर ब्रिटीश राजकर्त्यांनाही भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व्हावा याची गरज वाटू लागली होती. कारण भारतात प्रस्थापित केलेली शासकीय व्यवस्था चालवण्याकरिता सुशिक्षित व सुजान नागरिकांची गरज भासू लागली. शासनाच्या सर्वच विभागामध्ये वरपासून खालपर्यंत सर्व स्तरावर ब्रिटीश नागरिकांची नेमणूक करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. तसेच भारतासारख्या प्रतिकूल हवामान असलेल्या देशात लठ्ठ पगारांचे प्रलोभन दिल्याशिवाय इंग्रज माणसांची येण्याची तयारी नव्हती. त्यादृष्टीने कंपनी सरकारला स्थानिक नागरिकाला सुशिक्षित करणे गरजेचे वाटले म्हणून ब्रिटीश राज्यकर्त्यांनी शैक्षणिक विकासाचे दृष्टीने विशेष प्रयत्न केले. त्याबाबतचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे .

- **कंपनीमध्ये सरकारचे सुरवातीचे शैक्षणिक धोरण**

ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांच्या मनावर भारतातील विविधता समृद्धी आणि भारताचा सांस्कृतिक वारसा यांचा विलक्षण प्रभाव पडला होता. त्याने प्राचीन भारतीय साहित्य आणि विद्येला संरक्षण दिले.स्वतः वाङ्मय प्रेमी असलेल्या हेस्टिंगचे अरबी ,फारसी, बंगाली इत्यादी भाषावर प्रभुत्व होते. त्याच्या कारकिर्दीत अनेक ब्रिटीश अधिकाऱ्याना भारतीय भाषाबाबत आकर्षण निर्माण झाले. चार्लस विल्किन्स, सर विलियम जोन्स , हॅलेड, थॉमस मनरो इत्यादी पाश्चात्य विद्वानांनी भारतीय भाषांचा अभ्यास करून भारतीय साहित्याचा इंग्रजी भाषेमध्ये अनुवाद केला. कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधिश असलेल्या सर विलियम जोन्स यांनी वॉरन हेस्टिंग्जच्या प्रोत्साहनाने व मदतीने इ.स. १७८४ मध्ये 'एशियाटीकसोसायटी ऑफ बंगाल' ह्या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातुन भारतीय साहित्याचा परिचय पाश्चात्यांना व पाश्चात्य ज्ञानाचा परिचय भारतीयांना होवू लागला. वॉरन हेस्टिंग्जने१७८१ मध्ये कलकत्ता येथे मुस्लीम विद्यालयाची स्थापना केली. भारतातील प्रचलीत विद्येला प्रोत्साहन देवून त्याद्वारा प्रशासकीय कार्यासाठी नोकरवर्ग उपलब्ध व्हावा असा त्यांचा उद्देश होता. १७९१ मध्ये बनारसचा ब्रिटीश रेसिडेंट जोनाथन डंकन याने बनारस येथे संस्कृत महाविद्यालय स्थापन केले. ब्रिटीश न्यायाधीशांना हिंदू - मुस्लीम कायदा समजण्यास मदत व्हावी म्हणून हिंदू-मुस्लीम कायद्याचे ज्ञान असणारे तज्ञ विद्वान या महाविद्यालयातून तयार व्हावेत व त्यांनी प्रशासन कार्यात हातभार लावावा हा त्यापाठीमागे कंपनी सरकारच्या अधिकाऱ्याचा हेतू होता.

- **ख्रिश्चन मिशनऱ्याचे शैक्षणिक कार्य**

इ.स. १८१३ च्या कायद्यानुसार भारतात पाश्चात्य ज्ञानाचा आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी मिशनरी वर्गाला परवानगी प्राप्त झाली. त्यानुसार अनेक ख्रिश्चन मिशनरी भारतात दाखल झाले त्यामध्ये अलेक्झांडर डफ याने बंगाल प्रांतात अनेक शाळा काढल्या. कलकत्त्याचा उत्तरेला २० मैलावर असलेल्या श्रीरामपूरच्या डॅनिश मिशनमधील विलियम कॅरे, विलियम वार्ड, जॉन मार्शमन व त्यांची पत्नी ह्या सर्वांनी संस्कृत, मराठी, बंगाली व हिंदी इत्यादी भारतीय भाषाचा अभ्यास करून पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार करण्याचे मौलिक कार्य केले. ख्रिश्ती धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूने का होईना त्यांनी पाश्चात्य ज्ञान भारतीय भाषेतून देण्यासाठी अनेक ग्रंथाचे अनुवाद केले.

फेलिक्स कॅरे याने बंगाली भाषेत विश्वकोष तयार केला. मार्शमान याने भारताचा इतिहास, भूगोल व खगोल शास्त्रावर पुस्तके लिहली. त्याचबरोबर श्रीरामपुरचा डॅनिश मिशनरी गटाने इंग्रजी भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा कलकत्ता, ढाका चितगांव इत्यादी ठिकाणी सुरु केल्या. इ.स. १८१८ मध्ये श्रीरामपुरला बॅप्टिस्ट मिशन कॉलेज सुरु झाले. मार्शमन यांचे पत्नीने पुढाकार घेवून कलकत्याला पहिली मुलीची शाळा सुरु केली. इ.स. १८३४ मध्ये मुंबईला 'विल्सन कॉलेज' याशिवाय पुणे अहमदनगर, सुरत राजकोट याठिकाणीही ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी पुढाकार घेऊन मिशनरी शाळा सुरु केल्यात. अमेरिकन मिशनरी सोसायटीने सुद्धा इ.स. १८२४ मध्ये मुंबईला भायखळा येथे मुलींची शाळा सुरु केली. थोडक्यात ख्रिश्चन मिशनरी वर्गाने आपल्या शाळामधून पाश्चात्य ज्ञानाचा प्रसाराबरोबर धुमधडाक्यात ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देण्याला सुरुवात केली.

- **बंगाल व मुंबई प्रांतातील शिक्षणाचा प्रसार**

ख्रिश्चन मिशनरी वर्गाने पाश्चात्य ज्ञानाचा प्रसाराबरोबर ख्रिश्चन धर्माचा प्रसार आपल्या शैक्षणिक संस्थामधून सुरु केल्यामुळे अनेक बंगाल तरुणांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. त्यामुळे स्वाभाविकपणे बंगालमधील मिशनरी शाळाबद्दल प्रतिकूल भावना निर्माण झाली. ख्रिश्चन मिशनरी वर्गाने सुरु केलेल्या धर्म प्रसारांच्या कार्याला रोखण्यासाठी आपण स्वत: भारतीयाच्या स्वदेशी शाळा स्थापन कराव्यात असा विचार राजाराम मोहन रॉय यांनी मांडून इ.स. १८२२ मध्ये कलकत्याला इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणारी शाळा सुरु केली . इ.स. १८२५ मध्ये वेदांत कॉलेज स्थापण्यासाठी पुढाकार घेतला. इ.स. १८१९ मध्ये बंगाली लोकांनी पुढाकार घेऊन 'कलकत्ता स्कूल सोसायटी' स्थापन केली. इ.स. १८३५ पर्यंत एकट्या कलकत्ता शहरांत खाजगी प्रयत्नांनी सुरुझालेल्या शाळांची संख्या २५ होती. त्यामधून १४०० मुले शिक्षण घेवू लागली. तसेच महाराष्ट्रात मुंबई प्रांताचा गव्हर्नर जनरल माउंट स्टूअर्ट एलफिन्सस्टनने मातृभाषेतुन शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला. इ.स.१८२२ मध्ये त्यांच्याच पुढाकाराने 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल व बुक सोसायटी' स्थापन करण्यात आली पुढे या संस्थेचे नामकरण 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे करण्यात आले या सोसायटीच्या माध्यमातून भारतीय भाषेतून पाठ्यपुस्तकांची निर्मिती, शिक्षकांसाठी प्रशिक्षण आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळांची निर्मिती इत्यादी कामे झाली. परिणामी मुंबई पुणे, ठाणे व पणवेल इत्यादी ठिकाणी इंग्रजी शाळा व इतर जिल्ह्यात मातृभाषेत शिक्षण देणाऱ्या ११५ प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. इ.स. १८४० पर्यंत मुंबई प्रातांत मातृभाषेत शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या २१६ पर्यंत वाढली मुंबई एलफिन्सस्टन कॉलेज, ग्रांट मेडिकल कॉलेज, इंजिनीअरिंग कॉलेज ह्याच काळात सुरु झाले. बहरामजी मलबारी,जगन्नाथ शंकर सेठ, दादाभाई नौरोजी इत्यादी स्थानिक लोकांनी शिक्षण प्रसाराच्या कार्यात सक्रीय भाग घेतला. पुण्यामध्ये , महात्मा ज्योतीराव फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरु केली.

- **कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची स्थापना**

ब्रिटीश पार्लमेंटने इ.स. १८१३ च्या कायद्यानुसार भारतात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १ लक्ष रुपयाची तरतुद करून शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी कंपनीवर टाकली, परंतु इ.स. १८२३ पर्यंत कंपनी प्रशासनाकडून शैक्षणिक धोरण निश्चित्त झाले नव्हते, म्हणून गव्हर्नर जनरल अॅडमने इ.स. १८२३ मध्ये 'कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' ची स्थापना केली. सरकारी अनुदान कोणत्या शाळांना द्यायचे व शिक्षणाचे माध्यम काय असावे असे दोन प्रश्न समिती समोर उपस्थित झाले. अशावेळी समितीमध्ये असलेल्या एकूण दहा सदस्यांमध्ये दोन गट निर्माण झाले. एक प्राच्यविचारवादी आणि दुसरा पाश्चात्य विचारवादी. पाश्च्यात्यविचारवादी गटाचे मते पौर्वात्य ज्ञानावर कंपनीने भर द्यावा तसेच भारतातील प्रचलीत शिक्षण व्यवस्थेला प्रोत्साहन द्यावे. तर याउलट मत पाश्चात्य विचारवादी गटाचे असल्यामुळे दोन्ही गटातील वाद पराकोटीला गेला. त्यामुळे अनुदानाच्या रकमेच्या विनियोगाबाबत निर्णय होत नव्हता अशा परिस्थितीत गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा कायदेमंत्री म्हणून लॉर्ड मेकॉले भारतात आला. गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटीक याने त्याची नियुक्ती कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन अध्यक्ष म्हणून केली.

- **लॉर्ड मेकॉले यांचे निष्कर्ष**

'कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' चा अध्यक्ष म्हणून लॉर्ड मेकॉले याची नियुक्ती झाल्यानंतर त्याने इंग्रजी माध्यम व पाश्चात्य ज्ञानाचा जोरदार पुरस्कार केल्यामुळे समितीमधील वादावर पडदा पडला. आपल्या मताचे समर्थन करताना मेकॉले म्हणाला "भारतीयांना इंग्रजी भाषेमध्ये तज्ञ करता येणे सहज शक्य आहे आणि ह्याच दिशेने आपण प्रयत्न करावयास हवे. आपण भरतात असा एक वर्ग निर्माण करण्यासाठी प्रयत्नाची शिकस्त करावी की जो वर्ग आपण राज्य करीत असलेल्या असंख्य जनतेमध्ये दुभाषा म्हणून कार्य करील" तसेच लॉर्ड मेकॉले भारतात असाही एक वर्ग निर्माण करून इच्छित होता 'जो रक्त आणि रंगाने भारतीय परंतु प्रवृत्तीने इंग्रज' म्हणजे करड्या रंगाचे इंग्रज भारतात निर्माण करण्याचा हेतू लॉर्ड मेकॉले यांचा होता. म्हणून त्याने पुढील प्रमाणे निष्कर्ष मांडले.

१. पौर्वात्य ज्ञानाच्या अभ्यासास कंपनीने प्रोत्साहन देवू नये.

२. इस्ट इंडिया कंपनीतर्फे शिक्षणासाठी करण्यात येणारा खर्च फक्त इंग्रजी वाङ:मय व पाश्चात्य शास्त्र यांचा अभ्यास करण्यासाठीच खर्च होईल.

३. इंग्रजी भाषेतून दिले जाणारे ज्ञान व्यवहार उपयोगी असल्यामुळे भारतीयांना इंग्रजी शिक्षण देणे आवश्यक आहे.

४. भारतातील सर्व ज्ञानभांडारापेक्षा पाश्चात्य देशातील चांगल्या ग्रंथालयातील एका आलमारीचा कप्पा अधिक मौल्यवान आहे.

५. कायद्याच्या ज्ञानासाठी पौर्वात्य भाषांची गरज नाही हिंदू व मुसलमान धर्मग्रंथाचे इंग्रजीत रुपांतर करणे अधिक सोईचेराहील.

६. शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच असावे.

वरील स्वरुपांचे निष्कर्ष लॉर्ड मेकॉले याने काढून अशा आशयाचा एक प्रस्ताव २ फेब्रुवारी १८३५ मध्ये गव्हर्नर जनरलच्या कौन्सिल समोर मांडला. गव्हर्नर जनरलने त्याला मंजुरी देवून खास ठरावाद्वारे भारतातील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे असे निश्चित केले. एकूण लॉर्ड मेकॉलेचा प्रस्ताव भारताच्या शैक्षणिक इतिहासातील महत्वाचा टप्पा ठरला.

■ **वूडचा अहवाल (१८५४)**

लॉर्ड बेंटीकच्या कार्यकाळात मेकॉलेच्या शिफारशीनुसार भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. परंतु अपेक्षित प्रमाणात प्रसार व प्रचार होत नव्हता म्हणून ब्रिटीश संसदेने नियंत्रण मंडळाचा अध्यक्ष असलेल्या सर चार्ल्स वूडच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. ह्या समितीने भारतातील एकूण परिस्थितीचा अभ्यास करून एक योजना कंपनीच्या संचालक मंडळामार्फत गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांचेकडे पाठविली. वूडचा खलिता या नावाने प्रसिद्ध असलेली योजना भारतातील इंग्रजी शिक्षणाची 'मॅग्राकार्ट' मानली जाते. ह्या वूड अहवालामध्ये पुढील शिफारशीचा समावेश होता.

१. पाश्चात्य धर्तीवर असलेले शिक्षण भारतीयांना उपलब्ध करून देणे सरकारचे मुख्य उद्दिष्ट्ये असावे. त्यासाठी सरकारने युरोपियन कला, शास्त्र व तत्वज्ञानाचा प्रसार करावा.

२. उच्च शिक्षणासाठी सर्वोत्कृष्ट माध्यम इंग्रजी भाषा आहे तथापि उच्च शिक्षणाच्या विकासाच्या दृष्टीने भारतीय भाषा महत्वपूर्ण माणून त्यांना प्रोत्साहन द्यावे. देशी भाषाद्वारे पाश्चात्य ज्ञान सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावे.

३. खेड्यापाड्यातून देशी भाषामधून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा सुरु कराव्या. जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या ठिकाणी महाविद्यालयाची स्थपना करावी.

४. शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या खाजगी संस्थाना अनुदान द्यावे मात्र खाजगी संस्थानी शिक्षणाचा दर्जा कायम राखावा.

५. लंडन विद्यापीठाचे धरतीवर मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विद्यापीठे स्थापना करण्यात यावीत.

६. तांत्रिक शिक्षणाचे महत्व लक्षात घेवून औद्योगिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरु कराव्यात.

७. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे.

अश्याप्रकारे वूड समितीने सुचविलेल्या शिफारशी होत्या. लॉर्ड डलहौसी याने ह्या शिफारशी कार्यवाहित आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. इ.स. १८५५ मध्ये शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आले. मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे १८५७ मध्ये विद्यापीठे स्थापन झाले. बहुतेक शहरातून प्राथमिक व माध्यमिक विद्यालये उघडण्यात आली. तांत्रिक शिक्षणांचा प्रसार करण्यासाठी इंजिनिअरिंग महाविद्यालये सुरु झाली एकूण आधुनिक शिक्षण पद्धतीचा पाया १८५७ मध्ये घातला गेला.

■ **हंटर कमिशन**

व्हाईसरॉय लॉर्ड रिपनच्या कारकिर्दीत १८५४ नंतर झालेल्या शिक्षणविषयक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी इ.स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. ह्या समितीमध्ये २२ सदस्याचा समावेश होता. हंटर समितीने संपूर्ण देशभर दौरा करून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची पाहणी केली व सुमारे २०० शिफारशी असलेला अहवाल सरकारला सादर केला.

१. भारतातील शिक्षण व्यवस्थेमध्ये खाजगी संस्थाना अधिकाधिक प्रोत्साहन द्यावे खाजगी संस्थांना अनुदाने द्यावी त्यांनी चालविलेल्या शाळांना सरकारी शाळांचा दर्जा द्यावा.

२. लॉर्ड रिपनच्या योजनेनुसार आकारास आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबबदारी व नियंत्रण सोपवावे.

३. माध्यमिक विद्यालयातील वरच्या वर्गासाठी दोन प्रकार सुचविण्यात आले. एक प्रकार महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रवेश घेता यावा म्हणून साहित्य आणि शास्त्र अध्ययन स्वरूपाचा अभासक्रम असावा तर दुसरा ज्यांना व्यवसाय क्षेत्राची निवड करावयाची आहे त्यांच्यासाठी तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाचा अभ्यासक्रम असावा.

४. स्त्री शिक्षणांच्या प्रगती बाबत खेद व्यक्त करून स्त्री शिक्षणाला सरकारने प्रोत्साहन द्यावे.

५. शक्य तितक्या लवकर सरकारने माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्थेवरील आपले नियंत्रण दूर करावे.

हंटर समितीच्या शिफारशी भारतातील शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारक ठरल्या. शिक्षण व्यवस्थेवरील सरकारी नियंत्रण कमी करून खाजगी संस्थाना उत्तेजन व व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुरुवात ही शिफारस निश्चितच प्रशंसनीय होती. हंटर कमिशनच्या शिफारशीनंतर भारतात माध्यमिक शाळांची संख्या पुढील वीस वर्षात लक्षणीय वाढली.

- **लॉर्ड कर्झन विद्यापीठ कायदा (१९०४)**

लॉर्ड कर्झनच्या कार्यकाळात संपुर्ण देशभर प्राथमिक शिक्षणांचे क्षेत्रात अनास्था होती. उच्चशिक्षणाचे क्षेत्रात तर परिस्थिती अधिकच गंभीर होती. विद्यापीठाचे सिनेटमध्ये ज्ञान संवर्धनात रस नसलेल्या लोकांचा समावेश होता म्हणून शिक्षण क्षेत्रात अनेक दोष निर्माण झाले होते, म्हणून लॉर्ड कर्झनने संपुर्ण शिक्षणव्यवस्थेचे पुर्नव्यवस्थापण करण्याचे ठरविले. अर्थात कर्झन पक्का साम्राज्यवादी वृत्तीचा होता. भारतावरील ब्रिटीश पक्कड जास्तीत जास्त दृढ व्हावी हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट्ये होते. त्यादृष्टीने देशातील शिक्षणसंस्थांवर सरकारी नियंत्रण असावे असे त्यांचे मत होते. भारतीयांनी चालविलेल्या शिक्षण संस्था राष्ट्रीय चळवळीचे आश्रयस्थान बनून त्यामधून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग भारतीय सुशिक्षित वर्ग ब्रिटीश सत्तेच्या साम्राज्यवादी व पिळवणूकखोर धोरणांचे विश्लेषण करण्याकरीता करीत असल्यामुळे कर्झन अस्वस्थ झाला. लॉर्ड कर्झनला उच्च शिक्षणावर कडक सरकारी निर्बंध असावे असे वाटू लागले म्हणून कर्झनने देशातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांची एक बैठक सप्टेंबर १९०१ मध्ये सिमला येथे आयोजित केली. त्या परिषदेमध्ये झालेल्या निर्णयानुसार इ.स. १९०२ मध्ये सर टॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली एक विद्यापीठ समिती नियुक्त करण्यांत आले. या समितीने देशातील सर्व विद्यापीठांना व संलग्न महाविद्यालये यांना भेटी देवून एक अहवाल तयार केला. विद्यापीठाची घटना व कार्य यामध्ये सुधारणा करणे, विद्यापीठाच्या सिनेट व सिंडीकेट सभेची पुर्नरचना करणे, सरकार नियुक्त सदस्यांची संख्या वाढविणे, सिनेटने पारित केलेले ठराव वेळ पडल्यास फेटाळून लावण्यांचा अधिकार सरकारला असावा , खाजगी महाविद्यालयावर सरकारी नियंत्रण राहील. अभ्यासक्रमात भारतीय भाषांच्या अध्ययनांचा अंतर्भाव इत्यादी शिफारशी ह्या समितीने सुचविल्या होत्या.ह्या शिफारशीच्या आधारे २१ मार्च १९०४ रोजी विद्यापीठ कायदा पारित झाला. लॉर्ड कर्झन साम्राज्यवादी प्रवृत्तीचा होता. तसेच भारतीय जनतेच्या भावनेला तुच्छ लेखणारा एकाधिकारवादी शासक असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब ह्या कायद्यात उमटणे स्वाभाविक होते. एकूण लॉर्ड कर्झनच्या विद्यापीठ कायद्यामुळे खाजगी महाविद्यालयावरील सरकारी नियंत्रण वाढले. उच्च शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थावर मर्यादा निर्माण झाल्या. त्यामुळे नामदार गोखले सारख्या मवाळ नेत्यांनी सुद्धा ह्या कायद्यावर टीका केली.

- **स्वतंत्र शिक्षण खात्याची निर्मिती**

इ. स. १९१० पर्यंत शिक्षण गृहखात्याच्या नियंत्रणाखाली होते परंतु शिक्षण कार्याचा वाढता व्याप लक्षात घेवून स्वतंत्र शिक्षण खात्याची निर्मिती त्यावर्षी करण्यात आली. सर हरकोर्ट बटलर यांची नेमणूक शिक्षण खात्याची प्रमुख म्हणून करण्यात आले. तसेच इ.स. १९१३ मध्ये एका ठरावाद्वारे भारत सरकारने आपली शिक्षण विषयक निती विषद केली त्यानुसार प्रत्येक प्रातांत विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरले त्याचबरोबर प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी सोयी उपलब्ध करण्यात याव्या, शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी स्थानिक नेत्यांनी पुढाकार घ्यावा, सरकारी अनुदानावर भर देण्यात यावा अशा आशयाची सरकारी निती घोषित करण्यात आली.

- **सॅडलर विद्यापीठ आयोग (१९१७)**

इ.स. १९१७ मध्ये कलकत्ता विद्यापीठामधील समस्यांचा अभ्यास करण्यासाठी लीड्स विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मायकेल सॅडलर यांच्या अध्यक्षेतेखाली एक आयोग नियुक्त केला. विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे असा निष्कर्ष सॅडलर आयोगाने काढला. तसेच १९१३ च्या ठरावाद्वारे सरकारने प्रतिपादित केलेल्या शिक्षणनीतीवर शिक्कामोर्तब केले. त्याशिवाय महत्वाच्या सुचना केल्यात विद्याक्षेत्रात सरकारी ढवळाढवळ कमी असावी. विद्यापीठीय शिक्षकांच्या नियुक्त्या तज्ञामार्फत व्हाव्यात. विद्यापिठाकडे असलेले 'इंटरमिजीएट' चे वर्ग माध्यमिक शिक्षण संस्थाकडे सोपविण्यात यावे तसेच

माध्यमिक व इंटरमिजीएट शिक्षणावर नियंत्रण विद्यापीठाचे नव्हे तर ' बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन' चे असावे विद्यापीठ केंद्र सरकारच्या नव्हे तर प्रांतीय सरकारचे नियंत्रणाखाली असावे. १९१९ च्या सुधारणा कायद्यानुसार शिक्षण प्रांतिक सरकारचे सोपिव खाते होणार असल्यामुळे सरकारने सॅडलर आयोगाच्या शिफारशी मान्य केल्यात.

- **वर्धा योजना**

इ.स. १९३७ मध्ये महात्मा गांधींनी 'हरिजन' वृत्तपत्रामधून मुलोद्योग शिक्षण पद्धतीची गरज प्रतिपादन केली. विद्यार्थ्यांना बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक मेहनतीची कामे करावयास लावणारी, जीवन व शिक्षण यांचा समन्वय साधणारी एक अभिनव शैक्षणिक योजना वर्धा आश्रमामधून गांधीनी घोषित केली तिला वर्धा योजना असे म्हणतात. इ.स. १९३५ च्या कायद्यानुसार भारतात सार्वजनिक निवडणुका होवून १९३७ मध्ये आठ प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळे सत्तेवर आले. त्यानंतर डॉ. झाकीर हुसेन यांचे अध्यक्षतेखाली मुलोघोग शिक्षणपद्धतीवर साकल्याने विचार करून अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आले. त्यानुसार बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक, माणसिक नैतिक विकासावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवावे अशा स्वरूपाची शिक्षण पद्धती रुजविण्याची शिफारस झकेर हुसेन यांनी केली. काँग्रेसची सत्ता असलेल्या आठ रायात अतिशय उत्साहाने वर्धा योजना राबविण्यात आली.

**निष्कर्ष –**

सुरुवातीला ब्रिटीश राज्यकर्त्यांचा भारतीयांना शिक्षण देण्याबाबतचा दृष्टीकोन उदासीन स्वरूपाचा होता. परंतु इस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत असल्यामुळे लॉर्ड मेकॉलेच्या धोरणानुसार भारतीयांना पाश्चात्य ज्ञान इंग्रजी भाषेतून देण्याला सुरुवात झाली. त्यामुळे 'रक्त आणि रंगाने भारतीय परंतु प्रवृत्तीने इंग्रज भारतात निर्माण होवून लॉर्ड मेकॉलेची मनीषा पूर्ण झाली.' परंतुमहत्वाची बाब म्हणजे पाश्चात्य ज्ञानाच्या संपर्कामुळे भारतीयांना आपल्या मागासलेपणाची जाणीव निर्माण झाली. स्त्री शिक्षणाला ब्रिटीश राज्यकर्त्यांनी प्रोत्साहन दिले ही बाब महत्वाची ठरली. एकूण ब्रिटीश राजवटीतील भारताच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतांना एक गोष्ट अगदी स्पष्टपणे निदर्शनास येते ती म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचे स्वरूप निश्चित्त नव्हते. गव्हर्नर जनरलच्या वैचारिक दृष्टीकोनातून त्यात बदल होत होता.

**संदर्भग्रंथ –**

१. आचार्य डॉ. धनंजय, आधुनिक भारत , श्री. साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर, एप्रिल २०११.

२. वैद्य डॉ. सुमन, कोठेकर डॉ. शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ – १९२० ) श्री. साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर, फेब्रुवारी २०१५.

३. गायकवाड, कदम, थोरात, भारतीय चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, ऑगष्ट १९९४.

४. महाजन समाधान, आधुनिक इतिहास, महराष्ट्राच्या विशेष संदर्भात, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन पुणे २०१९.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar,Dist.Buldana